(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

# कोरोना व लॉकडाऊनचा चिकित्सक अभ्यास

**प्रा. बळवंतराव कुंडलीक जाधव**

एन. एस. सोटी. लॉ. कॉलेज, सांगली, जि. सांगली email- 1973jbk@gmail.com

**प्रस्तावना :**

आज कोरोनामुळे भारतामध्येच नव्हे तर संपूर्ण जगात संसर्गाचे तांडव माजले आहेत. या महामारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी भारत सरकारने व प्रत्येक राज्य सरकारने लॉकडाऊन जाहीर करून प्रत्येकाला घरीच राहण्याचा सल्ला न देता आदेश लागू केला आहे. त्यामुळे प्रत्येकजण आपआपल्या घरी राहून कोरोनापासून बचाव करू लागला. तसेच लॉकडाऊनने कोरोना संशयित रूग्नांना काही ठिकाणी घरीच होम कॉरनटाईन केले तर काहींना गावामध्ये असणाऱ्या सरकारी शाळामध्ये कॉरनटाईन केले तर कोरोना बाधितांना सरकारी दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले. कोरोनाचा प्रसार हा बाधित व्यक्ती इतर व्यक्तींच्या संपर्कात आल्याने होतो. त्यामुळे भारत सरकारला वेळोवेळी लॉकडाऊनची मर्यादा वाढवावी लागली. त्यामुळे भारतीयांच्या जीवनावर वेगवेगळे परिणाम दिसून आले. त्यातील काही सकारात्मक तर नकारात्मक आहेत. संशोधन पेपर हा सकारात्मक परिणामावर संशोधन करणारा आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) कोरोनामुळे पर्यावरणावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.
२) कोरोनामुळे मानवी जीवनावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.
३) कोरोनामुळे सरकारी संस्थानावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.
४) कोरोनामुळे तंत्रज्ञानाकडे वळलेला समाज.
५) कोरोनामुळे सरकारी कर्मचाऱ्यांचे महत्त्व याचा अभ्यास करणे.
६) महात्मा गांधीजी यांचा 'खेडयाकडे चला' या घोशणेचा अभ्यास करणे.
७) आंतरराश्ट्रीय पातळीवर वाढलेल भारताचे महत्त्व.

**विषय विवेचण :**

**१) कोरोनामुळे पर्यावरणावर झालेल्या परिणाम :**

पर्यावरणाचा विचार करीता वायू प्रदुषणावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे क्रमप्राप्त आहे. कोरोनामुळे सर्व वाहतूक, कारखाने, उद्‌योगधंदे, बांधकामे थांबल्यामुळे हवा स्वच्छ होऊ लागली. कोरोनापूर्वी हवेमध्ये मोठया प्रमाणात उद्‌योगधंदयाच्या धुराडीतून हवेत कार्बनडायऑक्साईड, नायट्रोजनसारखे विषारी वायू हवेत मिसळले जात होते ते थांबले. याचा परिणाम जालिंधर येथून २०० कि. मी. अंतरावरून हिमालय पर्वत स्पष्ट दिसू लागला आहे. आतापर्यंत प्रत्येक वर्षी भारतात १२ लाख लोक प्रदुषणाला बळी पडत होते. दिल्लीतील प्रदुषण कमी करण्यासाठी शासनाने स्मोक टॉवर बसवून जेवढा परिणाम झालेला नाही त्यापेक्षा लॉकडाऊनच्या काळात हवा जास्त शुध्द झाली. लॉकडाऊनमुळे 'वर्क फॉर्म होम' या संकल्पनेमुळे गाडया बंद, ऑफिसमधील एसी बंदमुळे हवा शुध्द होण्यास मदत झाली. दि. १० मे २०२० पर्यंतची आकडेवारी पाहिली दिल्लीत ४२ टक्के, मुंबई ६८ टक्के, कलकत्ता ४९ टक्के तर बेंगलोरमध्ये ३७ टक्केने हवेतील नायट्रोजन ऑक्साईडचे प्रमाण कमी होऊन हवा स्वच्छ झाली आहे.''

देशातील बहुतांश शहरे नदीकाठावर बसलेली आहेत. त्या शहरातील दूषित पाणी, रासायनिक पाणी नदीपात्रात सोडले जाते. लॉकडाऊनचा हवेबरोबरच पाण्यावरही खूपच सकारात्मक बदल झालेला आहे. सर्व कारखाने, उद्‌योगधंदे बंद असल्यामुळे नदी, तलाव, समुद्रात मिसळणारे रासायनिक पाणी, कचरा थांबला गेला व नैसर्गिकरीत्याच नदया समुद्रातील पाणी स्वच्छ होऊ लागले. लॉकडाऊनमुळे समुद्रकिनारी माणसांची वर्दळ बंद झाली त्यामुळे हजारो टन प्लॅस्टिक कचरा, इतर कचरा नदया व समुद्रात मिसळणे बंद झाले तसेच पाणी स्वच्छ होऊ लागले. भारत सरकारने गंगा नदी स्वच्छ करण्यासाठी एक विशेष मंत्रालय तयार

करून त्या विभागाला कॅबिनेटचा दर्जा देऊन कॅबिनेट मंत्री नेमण्यात आला व 'नमामी परे गंगा' ही मोहीम नदया स्वच्छ करण्यास कोटयावधी रूपये खर्च करूनही जी स्वच्छता झाली नाही ती लॉकडाऊनमुळे २१ दिवसात झाली. यामुळे शासनाचे करोडांची रूपयांची बचत झाली. पूर्वी गंगा नदीचे दूषित पाणी आता लॉकडाऊनमुळे पिण्यायोग्य इतके स्वच्छ झालेले आहे. गंगा व यमुना नदींच्या पाण्यात ४० ते ५० टक्के सुधारणा होऊन पाण्यातील पूर्वी ऑक्सीजनचे प्रमाण फक्त ६ते ७ प्रति लिटरमध्ये मिली ग्रॅमचे प्रमाण वाढून २१ दिवसाच्या लॉकडाऊनमुळे ९ ते १० पर्यंत पोहचले आहे.

सर्व मानव जात लॉकडाऊनमुळे घरीच असल्याने शहरातील रस्ते शांत व स्वच्छ आहेत. तसेच सर्व कारखाने, तांत्रिक मशनरी, वाहतूक, बोरवेल बंद असल्याने जमीनीला बसणारे हादरे (कंप) यांचा होत नाही. बंद शहरे, निरमनुष्य रस्ते यामुळे कचरा नसल्याने जमीनीचे प्रदुषनही थांबले. शांतता असल्याने भूगर्भ शास्त्रज्ञांना पृथ्वीची कंपने अभ्यासन्यासाठी खोलवर जाऊन कंपनांचा अभ्यास करावा लागत होता तो आता जमिनीवरून अभ्यासने सहज सोपे झाले आहे. मोलबर्न युनिवरसिटीच्या ऑरगानिक केमिस्ट विभागातील संधनानुसार जगभरातील लॉकडाऊनमुळे ओझोन थरामध्ये सुधारणा होत आहे असे दिसून येत आहे. कारण लॉकडाऊनमुळे जगभरात सर्व कारखाने, वाहतूक, कार्यालये (एसी) बंद असल्याने हवेत सोडले जाणारे विषारी वायूचे प्रमाण कमी झाल्याने ओझोन थर भरून येत आहे. त्यामुळे सूर्यापासून येणाऱ्या अतिनिल किरणापासून बचाव होऊ लागला. पृथ्वीचे तापमान कमी होऊ लागले. त्यामुळे ऑस्ट्रेलियातील कोरल रीफ भागात पाऊस पडणे बंद झाले होते ते लॉकडॉऊनमुळे संशोधकांना वाटते की, पाऊस पडणे सुरू होईल. ओझोन थर भरून आल्यामुळे पृथ्वीवर ४५ अंश डिग्री सेल्सीयस पर्यंत जाणारे तापमान ४० अंश डिग्री सेल्सीयस पर्यंत येऊ लागले आहे. लॉकडाऊनमुळे हवा, पाणी, जमीन, ओझोन थर यातील सकारात्मक बदलांचा वनस्पती व पशू पक्षी यांच्या जीवनावर सकारात्मक बदल दिसून येत आहे.

**२) कोरोनामुळे मानवी जीवनावर झालेला परिणाम :**

लॉकडाऊनमुळे संपूर्ण धावणारे जग थांबले. यांचा परिणाम मानवी जीवनावर मोठया प्रमाणात झाला. दररोज कामानिमित्त घराबाहेर पडणे थांबले. हॅटेल, रेस्टॉरेंट, ढाबे, जंगफूड, रोडकडेचे टेले बंद झाले. घरचे स्वच्छ, आरोग्यदायी जेवण सुरू झाले. साहजिकच गॅस ॲसिडीटीसारखे बाहेरील खान्यातून होणारे आजार थांबले. आरोग्य सुधारू लागले. गाडया कारखाने बंदमुळे दुषित हवा शुध्द होऊ लागली त्याचा आरोग्यास फायदा झाला. प्रत्येकजण कुंटूबाला वेळ देऊ लागला, आपआपला छंद जोपासू लागला, आरोग्याकडे विशेष लक्ष देऊ लागला. योगा, प्राणायम, सूर्यनमस्कार घरच्या घरी व्यायाम करू लागले. कोरोनाच्या भीतीने स्वच्छतेकडे पूर्वीपेक्षा जास्त लक्ष दिले जात आहे. वारंवार हात धुणे, मास्कचा वापर, घरच्या स्वच्छतेमुळे आजारांचे प्रमाण कमी झाले. मानसिक स्वास्थ्य लाभले. हार्टअटॅकसारख्या मृत्यूचे प्रमाण कमी झाले. पूर्वी गल्लीभोळातील ज्या क्लिनिकमध्ये तुफानी जी गर्दी दिसून येत होती ती आज ओस पडली आहे. लॉकडाऊनमुळे बाहेरील खाणे बंद झाले आहे. चैनीची ठिकाणे बंद (हॉटेल, रेव्ह पार्टी, बीच, थंड हवेचे ठिकाण, सिनेमा गृहे इ.) झाल्याने आर्थीक बचत मोठया प्रमाणात झाली. परिसरात उपलब्ध होत असलेल्या जीवनावश्यक वस्तूवर माणूस अवलंबून राहू लागला. गाडया मोटारीमुळे रोड अपघात थांबले. लॉकडाऊनपूर्वी २४ तासात भारतात १३०० रोड अपघात होत होते ते थांबले. प्रत्येकजण घरीच असल्याने व कोरोनाच्या भीतीने चोरी, मारामारी सारखे गुन्हे कमी झाले. तसेच लॉकडाऊनमुळे वर्क फॉर्म होमची ही नवीन संकल्पना समोर आली. त्यामुळे घरबसल्या इंटरनेटचा वापर करून ऑफिस कामे. टींचीग सुरू झाले. मानव तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करू लागला. एकदरीत लॉकडाऊनमुळे संपूर्ण शाररिक आराम, मानसिक स्वास्थ्य, कुंटूबातील प्रेम, नातेवाईकांशी मोबाईलद्वारे जवळीकता कायम राहीली. याचा मानवी आरोग्यावर चांगला परिणाम दिसून येत आहे.

लॉकडाऊनपूर्वी थोडया दुखन्याला दवाखान्याकडे मानव धाव घेत होता पण आज तो घरच्या घरी आयुर्वेदीक उपचार प्रमाणाला प्राधान्य देत असलेला दिसत आहे.

**३) लॉकडाऊनमुळे सरकारी संस्थानांवर झालेला परिणाम :**

कोरोनामुळे संसर्गच्या भीतीने व अपूऱ्या कीटमुळे खाजगी दवाखाने बंद होऊ लागले. यांचा भार सरकारी दवाखान्यावर पडू लागला. आजपर्यंत सरकारी दवाखाने म्हणजे 'गोरगरिबांच्यासाठी' असा एक गैरसमज समाजात निर्माण झाला होता. पण कोरोनामुळे या संकल्पनेला छेद दिला गेला. कोरोनामुळे सरकारी दवाखान्याविषयी समाजात विश्वास वाढू लागला. आज मोठयातील मोठा श्रीमंत व्यक्तीही कोरोनाचा उपचार घेण्यासाठी सरकारी दवाखान्याकडे धाव घेऊ लागला आहे. यामुळे सरकारी दवाखान्यावर भार वाढला व सरकारी दवाखान्यातील स्टाफ, बहुतीक सुविधा, वैधकीय उपकरणे यांच्या कमतरतेकडे सरकार लक्ष देऊ लागले. त्यामुळे शासनेने लॉकडाऊन कालावधीतच डॉक्टरांची भरती प्रक्रीया पूर्ण केली. भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ नुसार, भारतीय नागरीकांना जीवताचा अधिकार दिला आहे या अधिकारातच नागरिकांना शासनाकडून अध्यावत सुविधा मिळवणे हा त्यांचा मुलभूत अधिकार आहे त्यानुसार शासन पावले उलचत आहे.

ग्रामीण व शहरी भागातील जिल्हापरिषदच्या व महानगरपालीकेच्या शाळेत परजिल्हा व परराज्यातून आलेल्या व्यक्तींना कॉरनटाईन करण्यात येऊ लागले आहे. पण या शाळांमध्ये शौचालय, स्नानगृहे, पाण्याची व्यवस्था, लाईट व पंखे या भौवतीक सुविधांच्या अभावामुळे कॉरनटाईन लोकांचे हाल होत आहे. पण आपतकालीन परिस्थिती उदा. महापूर, माहामारी, भूकंप इ. अशा परिस्थितीत याच शाळांचा आश्रय घ्यावा लागतो. आजपर्यंत समाजात खाजगी शाळांचे आकर्षण मोठया प्रमाणात वाढलेले होते. खेडयातील मुले शहरातील खाजगी शाळांना प्राधान्य देत होती. पालक वर्ग प्रतिष्ठेसाठी खाजगी शाळांनकडे आकर्षले जात होते. शासनाने प्रशिक्षित, गुणवत्तेनुसार निवड केलेला शिक्षक स्टाफ सरकारी शाळेत देऊनही समाजातील बहुतांश पालक जाहिरातबाजीला बळी पडलेले आहेत. पण कोरोनाच्या भीतीमुळे सरकारी शाळांनकडे मुलांचा ओढा पून्हा वाढलेला दिसून येत आहे.

**४) लॉकडाऊनमुळे तंत्रज्ञानाकडे वळलेला समाज :**

कोरोनामुळे जगभरात लॉकडाऊन सुरू असून त्याचे काही चांगले परिणाम समोर येत आहेत. शासनाने 'घरी रहा, सुरक्षित रहा' पण शासकीय व खाजगी अधिकारी, कर्मचारी यांना घरीच राहून काम करणे वर्क फॉम होम ही नवीन संकल्पना समाजासमोर आली. या निमित्ताने सर्व विदयार्थी, शिक्षक, कर्मचारी, अधिकारी हे घरी राहूनच इंटरनेटच्या मदतीनेच कार्यालयीन कामे करू लागले. शिक्षक झूम ॲप, गुगल मिट ॲप वापरून शिकवणी घेऊ लागले. इंजिनिअर, आय टी कंपनीतील सर्व कर्मचारी लॅपटॉपचा वापर करून कामे करू लागली. तसेच सर्वसामान्य लोकही तंत्रज्ञानाकडे वळू लागले आहेत. जसे की, ई बॅकिंग, ई गव्हरमेंट, ई लाईट मीटर रीडींग, ई न्यूज पेपर्स व ई बुकस. लॉकडाऊनपूर्वीही तंत्रज्ञानाचा वापर होत होता, पण तो खूपच कमी होता. परंतु लॉकडाऊनमुळे बाहेर जाणे बंद झाले व सर्वसामान्य लोकांनाही तंत्रज्ञानाला प्राधान्य देणे बंधनकारक झाले. त्यामुळे इंधन बचत, वेळेची बचत व प्रदुषण कमी झाले.

**५) कोरोनामुळे सरकारी कर्मचाऱ्यांचे महत्त्व पटले :**

कोरोनाच्या भीतीने खाजगी वैद्कीय सुविधा बंद केल्या पण सरकारी दवाखाने डॉक्टर, परिचारीका, वार्डबॉय, ड्रॉयव्हर यांनी स्वता:च्या कुंटूबांची जीवाची पर्वा न करता अविरत कोरोना पेशंटची सेवा चालू ठेवली. स्थानिक पातळीवर माननीय जिल्हा प्रशासनाने खाजगी दवाखाने उघडे ठेवण्याचे आदेश दिले होते. तरीही खाजगी वैद्कीय सेवा चालू राहू शकली नाही. त्यामुळे असे जाणवू लागले की, खाजगी वैद्कीय सेवा, फी आकारणी, सेवा सुविधा, कामाचे तास यावर सरकारचे नियंत्रण असावे.

लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये पोलीस प्रशासन व निम लष्करी दले यांनी रोडवर अहोरात्र थांबून १३५ करोड जनतेला शिस्त शिकवली, आमलात आणली गेली. स्वताःच्या जीवाची पर्वा न करता जनतेची सेवा केली. फक्त महाराष्ट्रात ११०० पोलीस अधिकारी, कर्मचारी कोरोना बाधीत झाले. काहीनी तरी प्राण हे गमावले. यामुळेच अमेरिका व भारताची तुलना केली असता अमेरिकेत कोरोना मृत्यु दर १०,००,००० रूग्णांमागे २२६ आहे तर भारतात १०,००,००० रूग्णांमागे फक्त ०१ मृत्यु प्रमाण आहे. जागतिक महासत्ता असणाऱ्या अमेरिकेत कोरोनाने सर्वांत जास्त थैमान घातले आहे. भारताच्या तुलनेत अमेरिकेत कोरोनाने १०० पटीने अधिक उग्र रूप धारण केले आहे. अमेरिकेच्या तुलनेत भारतात कोरोनाचा प्रसार कमी झाल्याची बाब आकडेवारीच्या अभ्यासातून स्पष्ट होत आहे. अमेरिकेमध्ये १०,००,००० लोकांमध्ये ३८१६ कोरोनाबाधीत सापडतात तर भारतात १०, ००, ००० लोकांमध्ये फक्त ३८ कोरोनाबाधीत एवढे कमी रूग्ण आढळतात. याचे सर्व श्रेय सरकारी दवाखाने व पोलीस यंत्रनेला जाते. म्हणूनच सरकारी डॉक्टर, परिचारीका, कर्मचारी व पोलीस प्रशासन यांचे समाजातील तळागाळातून पुष्पवृष्टी करून स्वागत होत आहे.

**६) महात्मा गांधीजी यांचा 'खेडयाकडे चला' या घोषणेचा अभ्यास करणे.**

कोरोना माहामारीमुळे जगभरामध्ये हाहाकार माजला पण कोरोनाने ग्रामीण व शहरी अशी विभागणी केली. ग्रामीण भागातील कोरोनाबाधीतांचा आकडा शहरांच्या तुलनेत खूपच कमी आहे.

| शहरे जिल्हे | कोरोनाबाधीत आकडा | ग्रामीण जिल्हे | कोरोनाबाधीत आकडा |
|---|---|---|---|
| मुंबई | १०, ७४१ | रत्नागिरी | १६ |
| पुणे | २००८७ | कोल्हापूर | १६ |
| ठाणे | २००२ | नंदूरबार | १९ |

**स्त्रोत : सकाळ वर्तमान पत्र (सांगली) पान क्र. दिनांक ७ मे २०२०**

वरील आकडेवारी पाहता असे निदर्शनास येते की, ग्रामीणच्या तुलनेमध्ये शहरात कोरोनाबाधीतांची संख्या जास्त आहे. त्यामुळे शहरांतून ग्रामीण भागामध्ये लाखोंच्या संख्येने मानवी स्थलांतर सुरू आहे. महात्मा गांधीजीनी २० व्या शतकात सांगून ठेवले होते की, खेडयांचा विकास करा, खेडी स्वावलंबी बनवा, खेडयातील पंचायत राजचे सबलीकरण करा, ज्या सुविधा शहरी भागात मिळतात त्या सुविधा सामान्य नागरीकांना खेडयात उपलब्ध करून दया. असे झाले असते तर खेडयांचा विकास झाला असता. उद्योगधंदयांचे विकेंद्रीकरण झाले असते व याचा परिणाम रोजगारासाठी ग्रामीण भागातून शहरी भागाकडे लोकांचे पलायण झाले नसते. परिणामी कोरोनासारख्या माहामारीत रूग्णांची संख्या एवढया मोठया प्रमाणात वाढली नसती. कोरोनामुळे आपल्याला खेडयांचा विकास करण्याची विकास करण्याची सुवर्णसंधी पुनःश्च प्राप्त झाली आहे.

**७) आंतरराष्ट्रीय पातळीवर कोरोनामुळे भारताचे वाढलेल महत्त्व :**

कोरोनामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर पेट्रोलचे दर ५० टक्याने कमी झाले आहेत. कोरोनापूर्वी एक बॅरल पेट्रोलचा दर ५० ते ६० डॉलर होता. तो आता कमी होऊन अगदी २५ डॉलरपर्यंत आला आहे. भारत हा पेट्रोल आयात करण्यावर खूप मोठया प्रमाणात म्हणजेच आदाजे ११२ अरब डॉलर खर्च करत होता. पेट्रोलचा दर कमी झाल्यामुळे भारताचा पेट्रोलवर होणारा खर्च ५०टक्याने कमी झाला आहे.

जगभरातील देशांचा असा संशय आहे की, कोरोना विषाणू चीनच्या वुहान या शहरातील लॅबमध्ये तयार करण्यात आला व तो जगभर जाणीवपूर्वक पसरवण्यात आला. याचा फटका विकसीत देशांना उदा. अमेरिका, इटली, फ्रान्स, स्पेन अशा देशांना बसला. त्यामुळे या देशांची अर्थव्यवस्था पूर्णपणे ढासळली आहे. पण चीनमध्ये अगदी वुहान शहरापासून कमी अंतरावर असणाऱ्या शहरांना कोरोनाचा फटका बसला नाही. याउलट

पाश्चातय कंपन्या चीनमध्ये कारभार करत होत्या. त्या कंपन्यांचे शेअर्स चीनने विकत घेतले. यामुळे चीनने पाश्चातय देशांचा विश्वास गमावला आहे. त्यामुळे या मल्टीनॅशनअल कंपन्या चीनमधील आपला कारभार बंद करून अंदाजे २०० कंपन्या भारताकडे स्थलांतरीत होण्याचा विचार करीत आहेत. याचा परिणाम भारताला कोरोनामुळे औदृोगिक विकासाची संधी चालू आली आहे. यातील किमान ५० टक्के कंपन्या जरी भारतात आल्या तरी भारतातील खूप मोठी बेरोजगारी कमी होण्यास मदत होईल व भारतात फॉरन डायरेक्ट इनवेस्ट (एफ डी आय) वाढेल. यामुळे भारताच्या तीजोरीत परकीय चलन मोठया प्रमाणात वाढेल.

**निष्कर्ष :**

कोरोनामुळे जगभरात माहामारीचा अहाकार पसरला तो संपूर्ण जगासाठी दुर्दैवीच आहे. नाण्याला जशा दोन बाजू असतात त्याप्रमाणे कोरोनाचे काही तोटे आहेतच परंतु त्याचे फायदेही खूप आहेत. वरील संशोधनात असे सिध्द होत आहे की, कोरोनाचे काही फायदे आहेत. कोरोनामुळे हवा, पाणी, जमीन, निसर्ग यातील प्रदुषण कमी झाले. तसेच लॉकडाऊनमुळे जगभरातील मानवजातीला अनेक समस्यांना तोंड दयावे लागत असले तरी देखील मानवी गरजा कमी झाल्या. स्वच्छतेची सवय लावून घेतली. चैनीवरील खर्च कमी झाला. तसेच कोरोनाने सरकारी दवाखाने, शाळा, पोलीस प्रशासन, सरकारी वैद्कीय सेवा यांचे महत्त्व अधोरेखीत केले. तसेच कोरोनामुळे मानवाने नाखुषीने का होईना तंत्रज्ञान स्वीकारले व मानव विज्ञाननिष्ठ बनला.

महात्मा गांधीजीची खेडयाकडे चला ही घोषणा खरी ठरली. कोरोनामुळे भारताची आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिमा उंचावली व भारतीय संस्कृती ही सर्वश्रेष्ठ आहे हे सिध्द झाले. सामान्य माणसांची अशी एक मागणी होत आहे की, प्रत्येकी तीन महिन्यातून एक आठवडा सक्तीचे लॉकडाऊन शासनाने केले तर पर्यावरण सुधारण्यास खूप मोठी मदत होईल व पूर, दुष्काळ, माहामारी अशी संकटे उद्भवणार नाहीत. मानवी जीवन व सजीव सृष्टी सुखी होईल असे लॉकडाऊनचे फायदे दिसून येतात.

**संदर्भ सूची :**

१) अनिरूध्द — लॉकडाऊन में धरती को हुए चार बडे फायदे, इंटरनेट
२) श्री. जयंत सिन्हा, मा. खासदार — कोरोना संकट में भारत के लिए बडे आर्थिक फायदे
३) प्रा. गोपाळ गुरू — कोविड १९ च्या निर्मुलणासाठी खासगी आरोग्य क्षेत्राच्या नियमनाची गरज.
४) प्रा. गोपाळ गुरू — राज्याचे तर्क शास्त्र आणि कोविड १९.
५) मोहम्मद युनूस — आता संकल्प फेरमांडणीचा, सकाळ वर्तमान पत्र दिनांक ९ मे २०२०
६) अनंत बागायीतकार — टाळेबंदीचा चक्रव्युह, सकाळ वर्तमान पत्र दिनांक २७ एप्रिल २०२०.
७) इतर वर्तमान पत्रे व प्रसार माध्यमावरील बातम्या दिनांक १५ मार्च २०२० ते ९ मे २०२०.